अवतीभवती

परभणी : श्रेया इंटेलिजंट परीक्षेत यश मिळवणारे हसनापुर शाळेचे विद्यार्थी. सोबत मार्गदर्शक शिक्षक.

हसनापूर शाळेचे श्रेया परीक्षेत यश

परभणी : हसनापुर येथील जि.प. प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी श्रेया इंटेलिजंट अकॅडमी परीक्षेत घवघवीत यश मिळवले असून गुणवंतांचा शाळेत गौरव करण्यात आला. शिक्षण परिषदेमध्ये मयुरेश बाळू खर्डे, रोहित हनुमान मोरे यांना सुवर्णपदक देण्यात आले. या परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी मयुरी बाळू खर्डे, गणेश शंकर खर्डे, प्रांजल मारोती आरसड, यश गजानन डक, रुद्रप्रसाद खर्डे, स्वरा हनुमान मोरे यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी पेडगाव केंद्राचे केंद्रप्रमुख विनोद गोंगे, मुख्याध्यापक सदाशिव ढगे, मार्गदर्शक शिक्षक अनंत नरहिरे यांच्यासह केंद्रातील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षिका यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होते.

कुरुंदा पोलिसांनी रोखला बालविवाह

शिरड शहापूर : वसमत तालुक्यातील कुरुंदा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात होऊ घातलेला एका अल्पवयीन मुलीचा बालविवाह पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून रोखला. सदर विवाह परभणी येथे पार पडणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर तात्काळ कारवाई करण्यात आली. सहायक पोलिस निरीक्षक महादेव पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार भगीरथ वैजनाथ सवंडकर व पोलिस शिपाई ढेंबरे यांनी संबंधित गावात जाऊन चौकशी केली. सदर मुलगी शिकत असलेल्या जिल्हा परिषद प्रशालेच्या मुख्याध्यापकांकडून मुलीचा शालेय निर्गम उतारा तपासला असता संबंधित मुलगी अल्पवयीन असल्याचे स्पष्ट झाले. यानंतर मुलीच्या आई-वडिलांना कुरुंदा पोलीस ठाण्यात बोलावून बालविवाह प्रतिबंधक कायद्याबाबत माहिती देण्यात आली, कायदेशीर परिणामांची जाणीव करून दिली. पोलिसांच्या समुपदेशनानंतर पालकांनी विवाह रद्द करण्यास सहमती दर्शविली. त्यामुळे संभाव्य बालविवाह रोखण्यात पोलिसांना यश आले. या प्रकरणाची माहिती बाल संरक्षण अधिकारी श्रीमती कोरडे यांनाही देण्यात आली संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून ही कारवाई करण्यात आली.

जि. प. शाळेच्या २० विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट

परभणी : होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज संस्थेच्या शैक्षणिक पालकत्व उपक्रमात भारस्वाडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत परिसरातील २० एकल पालक विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वितरण करण्यात आले. भारस्वाडा, लोहरा, वडगाव, पेगरगव्हाण, डफवाडी आणि तामसवाडी येथील विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ मिळाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक, संतोष माहुरकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष त्र्यंबक शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक रवि लोहट, शिक्षकवृंद, पालक आणि स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला.

अनेक शाळांत पाठ्यपुस्तकेच मिळाली नाही

गंगाखेड तालुक्यातील चित्र; पालकांत तीव्र नाराजी

■ **अंकुश वाघमारे**

गंगाखेड, ता. २४ : नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होऊन दहा दिवसांचा कालावधील लोटला तरी तालुक्यातील अनेक शाळांतील विद्यार्थी अद्यापही मोफत पाठ्यपुस्तकांपासून वंचित आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून पालकांतही नाराजी आहे.

राज्य शासनातर्फे दरवर्षी पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वितरित केली जातात. मात्र यंदा पुस्तकांचा पुरवठा वेळेत न झाल्याने अनेक शाळांतील विद्यार्थ्यांना जुन्या पुस्तकांच्या आधारे किंवा शिक्षकांनी दिलेल्या नोट्सवर अभ्यास करावा लागत आहे. काही विद्यार्थ्यांनी बाजारातून पुस्तके खरेदी केली असली तरी आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थ्यांना त्याचा फटका बसत आहे. शाळा सुरू झाल्यानंतर अभ्यासक्रम शिकविण्याचे काम वेगाने सुरू झाले आहे. मात्र पाठ्यपुस्तके नसल्याने विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास करता येत नसल्याची तक्रार शिक्षकांनीही केली आहे.

ग्रामीण भागातील शाळांत ही समस्या अधिक गंभीर असल्याचे चित्र आहे. त्यामुळे संबंधित विभागाने पाठ्यपुस्तकांचे वितरण लवकरात लवकर पूर्ण करावे अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. तालुक्यातील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या हातात कधी पोचणार याकडे विद्यार्थी व पालकांचे लक्ष लागले आहे.

> पाठ्यपुस्तक वितरण संदर्भात मी शिक्षणाधिकाऱ्यांकडून अहवाल मागवून घेऊन ज्या शाळेत पाठ्यपुस्तके पोचली नाहीत. त्या शाळेत पाठ्यपुस्तकाचे वितरण करण्यास सांगेल.
> **-नतीशा माथूर**, सीईओ, जिल्हा परिषद, परभणी

> जिल्हा परिषदेच्या ८० टक्के शाळांना पाठ्यपुस्तकांचे वाटप झाले तर खासगी संस्थेच्या ५० टक्के शाळांत पाठ्यपुस्तकांचे वाटप झाले आहे. १०० टक्के पाठ्यपुस्तके आली नाहीत उर्वरित शाळांसाठी मागणी केली आहे.
> **-शशिकांत मुंडे**, बीईओ, पंचायत समिती, गंगाखेड

> तालुक्यातील कोणत्या शाळेला पाठ्यपुस्तके मिळाली नाहीत याबाबत गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून माहिती घेतो. ज्या शाळेला मिळाले नाहीत त्या शाळेला पाठ्यपुस्तके पुरवठा करण्यासंदर्भात कार्यवाही करतो.
> **-अक्षय सुक्रे**, बीडीओ, पंचायत समिती, गंगाखेड

> पाठ्यपुस्तकांचे वाटप झाले आहे. ज्या वर्गाचा अभ्यासक्रम बदलला आहे. त्या वर्गाचे पाठ्यपुस्तके कमी प्रमाणात आली आहेत.
> **सुनील पोलास**, शिक्षणाधिकारी, जि.प. परभणी

कायम विनाअनुदानित शाळांत पुरवठा?

■ **अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचा पुरवठा करणे आवश्यक असताना देखील शिक्षण विभागातील काही कर्मचारी चिरीमिरी घेऊन विनाअनुदानित शाळा, कायम विनाअनुदानित शाळांना पाठ्यपुस्तकांचा पुरवठा करत असल्याची चर्चा तालुक्यातील शिक्षण आहे.**

अभ्यासक्रम बदलला, प्रशिक्षण कुठे?



■ **१५ जून पासून शाळांना सुरवात झाली आहे. बदललेल्या अभ्यासक्रमातील सेतू प्रशिक्षण शिक्षकांना देण्यात आले नाही. त्यामुळे शिक्षकांना कसे शिकवावे, हा प्रश्न पडलेला आहे. शिक्षण विभागाच्या वतीने या तांत्रिक बाबीचा विचार करून अगोदरच नियोजन करणे आवश्यक होते.**

पूर्णा तालुक्यात खरिपाची पिके आली संकटात

पावसाच्या लहरीपणाने शेतकरी झाला हवालदिल

पूर्णा, ता.२४ (बातमीदार): तालुक्यात यंदा पावसाचा लहरीपणा आ णि मृग नक्षत्र कोरडे गेल्याने शेतकरी चिंतातूर झाले आहेत. मागील वर्षी अतिवृष्टी आणि पावसाच्या दीर्घ खंडामुळे पिकांचे नुकसान सोसलेल्या शेतकऱ्यांसमोर यंदा पुन्हा एकदा चिंतेचे ढग निर्माण झाले आहेत.

वेळेवर पाऊस न पडल्यास पेरणीच्या नियोजनात मोठा बदल करावा लागणार असून, या साऱ्यामुळे तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाले आहेत. तालुक्यातील एकूण ६३ हजार हेक्टर क्षेत्रापैकी ५३ हजार हेक्टर क्षेत्र पेरणीयोग्य आहे. येथे प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, ऊस आणि हळद या पिकांचे प्राबल्य आहे. मात्र, पावसाच्या अनिश्चिततेमुळे मशागत, पेरणी, निंदन आणि फवारणीवर झालेला खर्चही निघेल की नाही, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

मागील वर्षी निसर्गाच्या लहरीपणामुळे उसाचे उत्पादन घटले होते. यंदाही तूर, मूग, उडीद हि ९० दिवसांची पिके पावसाअभावी हातची जाण्याची चिन्हे आहेत. ही पिके वाया गेल्यास केवळ आर्थिक नुकसानच होणार नाही, कुटुंबाच्या दैनंदिन आहारातील डाळींची उपलब्धता कमी होऊन महागाईचा फटकाही बसणार आहे. फळ बागायतदारांची स्थिती तर अ धिकच गंभीर आहे. अवेळी येणाऱ्या वादळी वाऱ्यांमुळे केळी, मोसंबी आणि संत्रा, आंबा, जांभूळ बागांचे प्रचंड नुकसान होत असल्याने फळ उत्पादकही संभ्रमात आहेत. येलदरी, सिद्धेश्वर आणि जायकवाडी प्रकल्पांच्या कालव्याचा लाभ काही गावांना मिळत असला, तरी तालुक्यातील मोठी जमीन मुरमाड आणि अल्पकाळ ओलावा टिकवणारी आहे. गोदावरी आणि पूर्णा नदीकाठी उपसा सिंचनाद्वारे शेती बागायती करण्याचा प्रयत्न होत असला, तरी पावसाच्या दुर्भीक्षाने पिकांचे उत्पादन निश्चित राहिलेले नाही.

कृषी विभागाने पावले उचलावीत

■ **पावसाने अशीच ओढ दिल्यास सजीवांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शासनाने या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने तालुका कृषी अधिकारी व परभणी कृषी विद्यापीठ यांनी पावले उचलण्याची मागणी जोर धरत आहे.**

> निसर्गाचा समतोल बिघडण्याचे कारण अमाप वृक्षतोड झाली आहे. भविष्यात सुखासमाधानाने जगण्यासाठी प्रत्येक माणसाने एक झाड लावून त्याचे संगोपन केले पाहिजे, तरच पाऊस वेळेवर पडेल; निसर्गचक्र बिघडणार नाही. 'देणं समाजाचं' या चळवळीचा आदर्श जिल्ह्याने घ्यावा.
> **-सोपान भुसारे**, सदस्य 'देणं समाजाचं', पूर्णा

एकल महिला दिनानिमित्त सेलूमध्ये मार्गदर्शन कार्यक्रम

सेलू, ता. २४ (बातमीदार): महिला व बाल विकास विभाग, दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरिक उपजीविका अभियान, नगर परिषदेच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय एकल महिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

न. प. चे मुख्याधिकारी तथा प्रशासक महेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती शीला रामेश्वर काजळे होत्या. यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक रामचंद्र अकोलवार, भारतीय स्टेट बँकेची वित्तीय साक्षरता विभागाचे सुनील हट्टेकर यांनी महिलांना विविध बँकिंग सेवा, विमा योजना, कर्ज योजना तसेच आर्थिक सक्षमीकरणासाठी उपलब्ध संधी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सचिन चव्हाण, कौशल्य विकास मार्गदर्शन अधिकारी मदन शिंदे यांनी रोजगार व विविध संधीसह शासकीय योजनांची माहिती दिली. उपस्थितीत उपस्थित महिलांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेत विविध योजनांविषयी माहिती जाणून घेतली. राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. रामेश्वर काजळे यांनी महिलांना शासकीय योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. प्रास्ताविक उपमुख्याधिकारी भगवान चव्हाण यांनी केले. नगर परिषदेमार्फत लाभ देणाऱ्या विविध योजनांची माहिती सहायक प्रकल्प अधिकारी शीतल सोळंके यांनी दिली.

पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांशी कुलगुरूंचा संवाद

शैक्षणिक उपक्रम, संशोधन, गुणवत्ता व क्रमवारी सुधारण्यासाठी उपक्रम

परभणी, ता. २४ : वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे शैक्षणिक उपक्रम, संशोधन, विद्यार्थी कल्याण, संस्थात्मक विकास, विद्यापीठाची एकूण गुणवत्ता व क्रमवारी सुधारण्यासाठी परस्पर हिताच्या विविध विषयांवर कुलगुरू डॉ. इंद्र मणी यांनी पदवी, पदव्युत्तर, पीएच.डी. विद्यार्थी, प्राध्यापकांशी संवाद साधला. आपली ऊर्जा अनावश्यक गोष्टींमध्ये वाया न घालवता उद्दिष्टपूर्तीसाठी केंद्रित करावी, असे आवाहनही कुलगुरू डॉ. मणी यांनी केले.

व्यासपीठावर शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, माजी शिक्षण संचालक डॉ. उदय खोडके, नियंत्रक भाग्यश्री जाधव, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रवीण वैद्य, डॉ. राजेश क्षीरसागर, डॉ. राहुल रामटेके, डॉ. विश्वनाथ खंदारे, डॉ नीता गायकवाड, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम, सहायक नियंत्रक अनंत कदम, डॉ. गजेंद्र जगताप आदी उपस्थित होते. कृषी विद्यापीठाने विविध क्षेत्रात मोठे यश मिळवले आहे. भविष्यात विद्यापीठाला तसेच स्वतःला अधिक यशस्वी बनवण्यासाठी प्रत्येकाने प्रामाणिकपणे, कठोर परिश्रमाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने कार्य करावे, असे आवाहन करत कुलगुरू डॉ. मणी म्हणाले, विद्यापीठाने शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्याबरोबरच भौतिक व पायाभूत सुविधांच्या विकासातही उल्लेखनीय प्रगती साधली आहे.

> विविध योजनांच्या माध्यमातून अनेक संशोधन प्रकल्प केवळ परभणीपुरते मर्यादित न राहता मराठवाड्यातील विविध ठिकाणी उभारण्यात आले आहेत. एनआयआरएफ क्रमवारीत उच्च स्थान मिळविण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन नियतकालिकांत अधिकाधिक संशोधन लेख प्रकाशित होणे अत्यंत आवश्यक आहे.
> **- डॉ. इंद्र मणी**, कुलगुरू 'वनामकृवि' परभणी

आरोग्य केंद्रासाठी पदनिर्मिती मंजूर : आमदार विटेकर

परभणी,ता. २४ : पाथरी विधानसभा मतदारसंघातील मानवत उपजिल्हा रुग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रांसह जिल्ह्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांसाठी मोठ्या प्रमाणावर पदनिर्मिती करण्यात आली आहे. राज्य सरकारने आज त्यास मान्यता दिली आहे, त्यामुळे लवकरच या ठिकाणी नागरिकांना पूर्ण क्षमतेने आरोग्य सुविधा मिळतील अशी माहिती आमदार राजेश विटेकर यांनी दिली.

राजेश विटेकर

मानवत येथे ३० खाटाच्या ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन होऊन ते ५० खाटांचे झाले आहे. त्यामुळे नवीन २० पदे निर्माण करण्यात आली आहेत. पाथरी विधानसभा मतदारसंघातील उखळी, केकरजवळा, लोहगाव प्राथमिक आरोग्य केंद्रासह पेठशिवणी, असोला या आरोग्य केंद्रासाठी प्रत्येकी १५ पदांची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे त्या आरोग्य केंद्राना एकूण ७५ पदे मिळतील, पाथरी विधानसभा मतदारसंघातील नायकोटा, देवीनगर तांडा, किनोळा, थडी पिंपळगाव या उपकेंद्रांसह जिल्ह्यातील मसला, बाभळी, पुयणी, पिंपळगाव भत्या, गडडगव्हाण, लिंबाळा या उपकेंद्रात प्रत्येकी चार पदे असे ३६ पदे मंजूर झाली. आमदार राजेश विटेकर हे जिल्हा परिषद अध्यक्ष असताना अनेक प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांची मंजुरी मिळवून आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते, ती प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे मंजूर झाल्यानंतर, संपूर्ण बांधकाम होऊनहीं पदे निर्माण झाली नसल्याने रुग्णांना सुविधा मिळत नव्हत्या.

शासनाने बुधवारी (ता.२४) काढलेल्या शासन आदेशात वरील सर्व ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांची पदे निर्मिती केल्याने लवकर ही प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे कार्यरत होतील.

बियाणे उगवण प्रक्रीया मार्गदर्शन

सेलू : ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत बोर्डीकर कृषी महाविद्यालयातील कृषीदूतांनी तालुक्यातील डासाळा गावातील शेतकऱ्यांना बियाणे उगवण प्रक्रिया संदर्भात मार्गदर्शन केले. बियाणे उगवण्यासाठी योग्य आद्रता, ऑक्सिजन आणि अनुकूल तापमान आवश्यक असते. बियां पाणी शोषून घेतात, नंतर त्यातील सुप्त अवस्था संपते आणि उगवण प्रक्रिया सुरु होते. सर्व प्रथम मुळ बाहेर येते. त्यानंतर खोड व पाने विकसित होतात आणि नवीन रोप तयार होते. यासह प्रात्यक्षिकात शेतकऱ्यांना दर्जेदार बियांणाची निवड, बिज प्रक्रिया योग्य पेरणी पद्धती, उगवण टक्केवारी वाढविण्याचे उपाय याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

निधन

शकुंतलाबाई घाटगे

परभणी : तालुक्यातील साळापुरी येथील ज्येष्ठ नागरिक शकुंतलाबाई बालासाहेब घाटगे (वय ८८) यांचे मंगळवारी (ता.२३) निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी (ता.२४) साळापुरी येथील गोदाकाठावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, तीन मुली, जावई, दोन सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. मुंबई येथील सर ज्जे हॉस्पिटल मधील मेंदू विकार तज्ज्ञ व रेडिओलॉजिस्ट डॉ.शरद घाटगे यांच्या त्या मातोश्री होत.

जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार **सतीश साहेबराव आहेरकर रा. ता. पाथरी जि. परभणी** यांनी दिलेल्या माहीती व अधिकार पत्रावरून कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी लिहून देणार **भिमराव नारायणराव सावंत, रा. राहुलनगर, परभणी ता. जि. परभणी** यांचे मालकी व ताब्याचा पंचायत समिती परभणी ग्रामपंचायत कारेगाव, ता.जि. परभणी येथील सर्वे नं. 19, गट नं. 81 ज्याचा उपसंचालक नगर रचना कार्यालय परभणी तसेच NA No.82/LND/BD/CR-29 Date : 25/01/82 उपजिल्हाधिकारी सेलू असा असून प्लॉट नं. 06 ज्याची लांबी दक्षिणउत्तर 40 मीटर व रूंदी पुर्वपश्चिम 18 मीटर एकूण 720 चौ. मीटर मोकळा प्लॉट संपुर्ण आमचे पक्षकार **सतीश साहेबराव आहेकर** यांनी कायम खरेदी करण्याचा ठराव केलेला आहे. **ज्याची चतुःसिमा**

पुर्वेस - 09 मीटरचा अंतर्गत रस्ता, **पश्चिमेस** - प्लॉट नंबर 07, **दक्षिणेस** - परभणी- वसमत रोड, **उत्तरेस** - प्लॉट क्रमांक 14 व 13

आमचे पक्षकार **सतीश साहेबराव आहेकर** यांनी लिहून देणार **भिमराव नारायणराव सावंत** यांचेकडुन कायम खरेदी करण्याचा ठराव केला आहे. सदरच्या वरील वर्णनाच्या मिळकतीबाबत कोणाचा काही आक्षेप, उजर, हककसंबंध, अधिकार, बोजा, भाऊ हिस्सा, तारण, दान, बय-बक्षीस, विक्री ठराव, शासकिय व निमशासकिय कर्ज, कोर्ट प्रकरण वगैरे कसल्याही प्रकारचा आक्षेप असेल तर सदर नोटीस जाहीर झाल्यापासुन 15 (पंधरा) दिवसांच्या आत सर्व कागदपत्रांसह लेखी आक्षेप आम्ही दिलेल्या खालील पत्त्यावर नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचा आक्षेप उजर नाही आला तर सदरची मिळकतही निर्वोवाद, निर्जोखमी व लिहून देणार **भिमराव नारायणराव सावंत** यांच्या मालकी व ताब्याची आहे असे गृहीत धरून आमचे पक्षकार ठरावाप्रमाणे रितसर खरेदीखत स्वतःच्या अथवा त्यांनी सांगेल त्या व्यक्तीच्या नावे करून घेतील.

करीता हे जाहीर प्रगटन दिले जाते. मुदतीनंतरचा आलेला आक्षेप मुदत बाह्य समजुन स्विकारला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

जाहीर प्रगटन देणार
सतीश साहेबराव आहेरकर
मो.नं. 8459300457
मार्फत,

ॲड. आर. पी. भिसे
मोंढा मार्केट, शेळगाव रोड सोनपेठ ता. सोनपेठ जि. परभणी, मोबाईल नंबर- 9763761100

म.शि.प्र.मंडळाचे
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

पाहिजेत थेट मुलाखत (Walk in Interview)

संदर्भ : मा. विभागीय शिक्षण संचालक, उच्च शिक्षण नांदेड यांचे नाहरकत प्रमाणपत्र (जा.क्र.संसउशिनां/अनु-२/२०२५-२६/E-1/१३७२८८६)

शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करिता कायम विनाअनुदानित विषयासाठी एकत्रित मानधन / तासिका तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात अधिव्याख्यातांची पदे भरणे आहेत...

अ) कायम विनाअनुदानित (पदवी) :
बी.एस्सी.सी.एस. (४), बी.एस्सी. डेटा सायन्स (३), भूगोल (१)

ब) कायम विनाअनुदानित (पदव्युत्तर)
इंग्रजी (३), राज्यशास्त्र (२), समाजशास्त्र (२), इतिहास (२), वाणिज्य (२), भौतिकशास्त्र (२), वनस्पतीशास्त्र (२), प्राणीशास्त्र (२), रसायनशास्त्र (२), सूक्ष्मजीवशास्त्र (२), संगणकशास्त्र (२), गणित (२), अर्थशास्त्र (२), मराठी (२) महिला वसतिगृह अधीक्षिका (१), टेक्निशियन (१)

शैक्षणिक अर्हता : अ) कायम विनाअनुदानित (पदवी)
बी.एस्सी.सी.एस. : MSc (CS) or a Master's in a related field with 1st class & 2 Years of professional experience
बी.एस्सी. डेटा सायन्स : MSc (DS) or a Master's in a related field with 1st class & 2 Years of professional experience
भूगोल : एम.ए. नेट/सेट / पीएचडी,
टेक्निशियन : MSc (CS)/MCA with at least two years experience

ब) कायम विनाअनुदानित (पदव्युत्तर) :
चांगली शैक्षणिक कारकीर्द (Good Academic Record) व पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के गुण (मागासवर्गीयांसाठी ५० टक्के गुण) आणि नेट/सेट पीएचडी. वसतिगृह अधीक्षिका : पदवीधर व शिस्तप्रिय महिलेस प्राधान्य

मुलाखत दिनांक : वरिष्ठ विभाग पदवी व पदव्युत्तर (कायम विनानुदानित) दि. ०१.०७.२०२६ (बुधवार) सकाळी ११ वा.

टीप : वरील सर्व पदांसाठी आरक्षण हे शासकीय नियमाप्रमाणे राहील. मुलाखतीस येतांना उमेदवारांना प्रवास/दैनिक भत्ता दिला जाणार नाही. अर्जासोबत आवश्यक शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडाव्यात.

मा.आ.श्री.	मा.आ.श्री.	मा.श्री.	डॉ. बी.यु.जाधव
प्रकाशराव सोळंके	सतीशराव चव्हाण	हेमंतराव जामकर	
अध्यक्ष	सरचिटणीस	प्रमख सदस्य. म.वि.स.	प्राचार्य

● म.शि.प्र.मंडळ, छत्रपती संभाजीनगर ● श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

पंजाब नैशनल बँक भारत सरकारचा उपक्रम | pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेद्वारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३१.१२.२०२५ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**शाखा- पीएनबी - हिंगोली (७९०४००)** **कर्जदार - मे. गणराज कृषी केंद्र दिग्रस कऱ्हाळे** पत्ता - मालमत्ता नं. १५४८, मेन रोड, दिग्रस (के.) ता. हिंगोली, जि. हिंगोली-४३१७०५ **प्रोप्रायटर श्री. माधव किसन कऱ्हाळे** पत्ता - व्हीपीओ दिग्रस कऱ्हाळे, ता. हिगोली, जि. हिंगोली - ४३१ ७०५ **जामीनदार / तारणदार - श्री. साहेबराव किसनराव कऱ्हाळे** पत्ता - व्हीपीओ दिग्रस कऱ्हाळे, ता. हिंगोली, जि. हिंगोली - ४३१ ७०५	१. मालमत्ता नं. १५४८, सर्व्हे नं. १२११, मेन रोड, दिग्रस (कऱ्हाळे), ता. आणि जिल्हा हिंगोली. क्षेत्रफळ एरिया ३५० स्क्वे.मी. (अंदाजे) **मालकी हक्क - श्री. माधव किसन कऱ्हाळे चतुःर्सिमा - पुर्व** - सरस्वती गिरीची जमीन , **पश्चिम** - सावली रोड, **दक्षिण** - शिवचरण गिरी यांची जमीन, **उत्तर** - रामचंद्र सोनाजी काळे यांची जमीन **मालमत्ता आयडी - PUNB7NZ78227198** २. मालमत्ता नं. ५७६, मेन रोड, दिग्रस (कऱ्हाळे), ता. आणि जिल्हा हिंगोली. **क्षेत्रफळ एरिया १११.४८ स्क्वे.मी. मालकी हक्क - साहेबराव किसनराव कऱ्हाळे चतुःर्सिमा - पुर्व** - श्री. शिवाजी प्रभुजी कऱ्हाळे यांची मालमत्ता, **पश्चिम** - रस्ता, **उत्तर** - श्री. गणपती सुरुशे यांची मालमत्ता, **दक्षिण** - श्री. रमेश कऱ्हाळे यांची गल्ली मालमत्ता **मालमत्ता आयडी - PUNB7NZ78234317**	**अ) १८.०५.२०२४ पेपर प्रसिध्दी दिनांक १३.०७.२०२४ ब) रु. ३१७६१७७.२४ + इतर व्याज श्री क) २५.०९.२०२४ ड) सांकेतिक ताबा**	१. अ) रु. १७.४० लाख ब) रु. १.७४० लाख (१७.०७.२०२६) क) रु. ०.१० लाख १. अ) रु. ९.४३ लाख ब) रु. ०.९४३ लाख (१७.०७.२०२६) क) रु. ०.१० लाख	**दि. १७.०७.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत**	**माहित नाही**

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, **17.07.2026** @